खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**

काळा रंग हा अशुभ समजला जातो.
पण प्रत्येक काळा रंगाचा
फळा हा अनेक विद्यार्थांचे
आयुष्य उजळवत असतो...

वर्ष : ०५ | अंक : २४६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.१८ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## महिला व बालविकास विभागातील पदभरतीचे निकाल जाहीर करण्याच्या प्रक्रियेस गती द्यावी - आदिती तटकरे



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१७, मुंबई :** महिला व बालविकास विभागातील विविध पदांच्या भरती प्रक्रियेला वेग देण्यात यावा. विशेषतः वर्ग ३ व ४ च्या सरळसेवा भरती प्रक्रियेसंदर्भात परीक्षांचे निकाल तातडीने जाहीर करण्याच्या सूचना महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिल्या.

पदभरती प्रक्रियेचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात झालेल्या बैठकीत सचिव डॉ. अनुपकुमार यादव, आयुक्त माधवी सरदेशमुख तसेच सहसचिव वि.रा. ठाकूर, उपायुक्त गिरासे व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, विभागातील विविध पदांसाठी घेण्यात आलेल्या परीक्षा निकाल अंतिम टप्प्यात असून, निकाल जाहीर झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात पदभरती करण्यात येणार आहे. त्यामुळे विभागातील रिक्त पदे भरून सेवा वितरण अधिक सक्षम आणि गतिमान होणार आहे.

मंत्री आदिती तटकरे यांनी भरती प्रक्रिया पारदर्शक, वेळेत आणि कार्यक्षम पद्धतीने पूर्ण करण्यावर भर देत, निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया गतीमान करण्याचे निर्देश दिले. या निर्णयामुळे महिला व बालविकास विभागाच्या कामकाजाला अधिक बळकटी मिळणार असून नागरिकांना मिळणाऱ्या सेवांमध्येही गुणवत्ता वाढणार आहे.

## होर्मुझचा मार्ग मोकळा, तेलाच्या किमती एका झटक्यात १०% घसरल्या

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, मुंबई :** जगाला काहीसा दिलासा मिळाला आहे. कच्च्या तेलाच्या किमतीत तब्बल १० टक्क्यांची घसरण झाली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांनी होर्मुझची सामुद्रधुनी आता पूर्णपणे खुली झाल्याचे जाहीर केल्यानंतर ही घसरण झाली आहे. होमर्झ उघडल्याच्या घोषणेनंतर, ब्रेंट क्रूडच्या किमती जवळपास १० टक्क्यांनी घसरून प्रति बॅरल ८९.१२ डॉलरवर आल्या. याच वेळी अमेरिकेच्या शेअर बाजारात मोठी तेजी आली.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इराण यांच्याकडून होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे खुली झाल्याची बातमी येताच, वॉल स्ट्रीटवर आनंदाची लाट पसरली. तिन्ही प्रमुख निर्देशांक किंचित वधारले होते. एस अँड पी ५०० निर्देशांक ५८.११ टक्क्यांनी वधारला होता. डाऊ जोन्स इंडस्ट्रियल



एव्हरेज ६५२.८२अंकांनी, म्हणजेच १.३४ टक्क्यांनी वाढला आणि नॅसडॅक, जो एक तंत्रज्ञान निर्देशांक आहे, २४९.५८अंकांनी, म्हणजेच १.०४ टक्क्यांनी वधारला होता.

ट्रम्प यांनी एका सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिले, होर्मुझची सामुद्रधुनी व्यापार आणि पूर्ण जलवाहतुकीसाठी पूर्णपणे खुली आणि सज्ज आहे. आमच्या आणि इराणमधील वाटाघाटींची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत इराणवरील नौदल नाकेबंदी पूर्णपणे लागू राहील. ही प्रक्रिया खूप लवकर पूर्ण व्हायला हवी, कारण बहुतेक तपशील आधीच निश्चित झाले आहेत. या प्रकरणाकडे लक्ष दिल्याबद्दल धन्यवाद! होर्मुझची सामुद्रधुनी खुली झाल्याने अमेरिकेच्या बाजारात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

होर्मुझची सामुद्रधुनी हा जगातील सर्वात महत्त्वाच्या तेल मार्गांपैकी एक आहे, ज्यामधून जगभरात मोठ्या प्रमाणात कच्च्या तेलाची वाहतूक केली जाते. अलीकडील तणाव आणि युद्धसदृश परिस्थितीमुळे या मार्गाबद्दल चिंता वाढली होती, ज्यामुळे तेलाच्या किमती वाढल्या होत्या. आता दोन्ही बाजूंनी सागरी मार्ग खुला असल्याचे आणि पुरवठ्यात कोणताही व्यत्यय नसल्याचे संकेत दिल्याने, बाजारात दिलासाची लाट पसरली आहे, ज्यामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाली आहे.

**पेट्रोल-डिझेलच्या किमती कमी होतील...**

आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती स्वस्त झाल्यास, त्याचा परिणाम भविष्यात पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींवर होऊ शकतो. हे पूर्णपणे भविष्यातील बाजाराच्या ट्रेंडवर अवलंबून असेल.

## राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या शेवटच्या सहा दिवसांमध्ये तपासणी मोहीम अधिक काटेकोरपणे करा



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१७, राहुरी :** राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीस अवघे सहा दिवस शिल्लक असताना निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निर्भय व निष्पक्ष वातावरणात पार पडावी यासाठी सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अधिक दक्षपणे व संवेदनशीलतेने काम करावे. तपासणी मोहीम अधिक काटेकोरपणे करण्याचे निर्देश खर्च निरीक्षक व्ही. कुमार यांनी दिले.

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित खर्च आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे, लेखाधिकारी श्री. नागरे, उत्पादन शुल्क अधीक्षक प्रमोद सोनोने यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

खर्च निरीक्षक व्ही. कुमार म्हणाले, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संशयास्पद हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात यावे. अवैध रोकड व मद्य वाहतुकीवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात यावे. मतदारांना कुठल्याही प्रकारचे प्रलोभन दिले जात नाही ना, याची काटेकोर तपासणी करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

एफएसटी, व्हीएसटी व एसएसटी पथकांनी अधिक सक्रिय राहून मतदारसंघात येणाऱ्या वाहनांची कसून तपासणी करावी. तसेच 'पेड न्यूज'च्या अनुषंगाने माध्यमंतील बातम्यांवर सतत लक्ष ठेवावे व समाज माध्यमांवरून राजकीय पक्षांकडून करण्यात येणाऱ्या प्रचारावरही बारकाईने नजर ठेवावी. प्रचारासाठी वापरल्या जाणाऱ्या साहित्याची तपासणी करूनच जाहिरातींना पूर्वप्रमाणीकरण देण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच, निवडणूक कायदे व नियमांची काटेकोर अंमलबजावणी करत नाविन्यपूर्ण संकल्पनांचा वापर करून प्रभावी कामकाज करावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

## विधानसभेतील अर्धा तास चर्चेचा परिणाम : पंकजा मुंडेंनी झरपट नदीची केली पाहणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, चंद्रपूर :** विधानसभेत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मांडलेल्या अर्धा तास चर्चेला राज्य सरकारने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करत पर्यावरण तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज चंद्रपूर जिल्ह्यात प्रदूषणाचा व्यापक पाहणी दौरा केला. या दौऱ्यामुळे चंद्रपूर शहरातील वाढत्या प्रदूषणाच्या प्रश्नाला पुन्हा एकदा राज्याच्या पातळीवर गांभीर्याने हाताळले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे.

दौऱ्यादरम्यान पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी चंद्रपूर शहरातील झरपट नदीची प्रत्यक्ष पाहणी करून नदीतील प्रदूषणाची तीव्रता, साचलेला कचरा, औद्योगिक व सांडपाण्याचा प्रवाह याचा सखोल आढावा घेतला. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधत त्यांनी तातडीच्या उपाययोजना राबविण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. उल्लेखनीय म्हणजे, दिनांक २४ मार्च २०२६ रोजी विधानसभेत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी नद्यांच्या प्रदूषणाचा गंभीर मुद्दा उपस्थित करत झरपट व इरई या नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी ठोस पावले उचलण्याची मागणी केली होती. या चर्चेनंतरच शासनाने या विषयाकडे प्राधान्याने लक्ष देत आजचा पाहणी दौरा निश्चित केला.

यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले की, राज्यात लवकरच नदी पुनर्जीवन प्राधिकरण स्थापन करण्यात येणार असून, त्याच्या पहिल्या टप्प्यात चंद्रपूर जिल्ह्यातील झरपट व इरई या दोन्ही नद्यांचा समावेश केला जाणार आहे. त्यामुळे या नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी दीर्घकालीन, शाश्वत व परिणामकारक उपाययोजना राबविण्यास गती मिळणार आहे.

दौऱ्यादरम्यान आ. सुधीर मुनगंटीवार यांनी झरपट नदीचे धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित करत केवळ तात्पुरत्या नव्हे तर दीर्घकालीन उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याची मागणी केली. तसेच स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांची जाणीव करून देत प्रदूषण



नियंत्रणासाठी कठोर निर्णय घेण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

या पाहणी दौऱ्यावेळी जिल्हाधिकारी वसुमना पंत, मनपा आयुक्त, महापौर संगीता खांडेकर, नगरसेवक सर्वश्री राहुल पावडे, प्रज्वलंत कडू, नंदू नागरकर, वसंत देशमुख, सुरज पेदुलवार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व स्थानिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यानंतर पर्यावरण तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी चंद्रपूर येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयाला भेट देत तेथील सुविधा, मनुष्यबळ व उपलब्ध सेवांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी नागरिकांना अधिक दर्जेदार व तत्पर सेवा मिळाव्यात यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त सुरेश कुंभरे यांनी त्यांचे स्वागत केले.

या भेटीदरम्यान आमदार सुधीर मुनगंटीवार, जिल्हाधिकारी वसुमना पंत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मनपा आयुक्त तसेच भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

## नागपुरात उष्णतेच्या लाटेचा इशारा; आज सर्व शाळांना सुट्टी जाहीर

**दि.१७, नागपूर :** नागपूर जिल्ह्यात वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला असून शनिवारी, १८ एप्रिल २०२६ रोजी नागपूर जिल्ह्यातील सर्व शाळा आणि शैक्षणिक संस्था बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जारी केले आहेत. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या पूर्वसूचनेनुसार जिल्ह्यात 'हीट वेव्ह'ची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.

हवामान विभागाने १८ एप्रिलसाठी नागपूर जिल्ह्याला 'यलो अलर्ट' जारी केला आहे. काही भागांत उष्णतेची तीव्र लाट येण्याची शक्यता वर्तवली आहे. मार्च महिन्यापासूनच तापमानात सातत्याने वाढ होत असून पारा ४३ अंशांच्या पुढे गेला आहे. दुपारच्या वेळेत उन्हाचा कडाका अधिक जाणवत असल्याने लहान मुले, वृद्ध तसेच कामगार वर्गाच्या आरोग्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने अंगणवाडी, प्राथमिक आणि माध्यमिक शाळा, महाविद्यालये तसेच कोचिंग क्लासेसना एक दिवसाची सुट्टी जाहीर केली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना उष्णतेच्या तीव्रतेपासून दिलासा मिळणार आहे. पुढील काही दिवस हवामानाचा आढावा घेऊन गरज भासल्यास आणखी निर्णय घेतले जाण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

दरम्यान, उष्णतेच्या वाढत्या लाटेचा सामना करण्यासाठी जिल्ह्यात 'हीट ॲक्शन प्लॅन' लागू करण्यात आला आहे. या अंतर्गत जिल्ह्यात एकूण ५६ शीतकक्ष तयार करण्यात आले असून त्यापैकी दोन उपजिल्हा रुग्णालये आणि ११ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या शीतकक्षांमध्ये एसी किंवा हाय-स्पीड कूलर्स, मुबलक बर्फ, तसेच गंभीर रुग्णांसाठी थंड पाण्याने स्पंजिंग किंवा बाथची सोय करण्यात आली आहे.

## परतवाडा येथील १८० युवतींच्या लैंगिक शोषण प्रकरणातील दोषींना फाशीची मागणी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, चिखली (बुलढाणा) :** परतवाडा येथे उघडकीस आलेल्या धक्कादायक लैंगिक शोषण आणि ब्लॅकमेलिंग प्रकरणात सुमारे १८० हून अधिक युवतींचे शोषण झाल्याची माहिती समोर येताच संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. मुख्य आरोपी मोहम्मद अयाज आणि त्याच्या साथीदारांनी शेकडो अश्लील व्हिडिओ बनवून ते प्रसारित केल्याच्या पार्श्वभूमीवर, दोषींची सखोल चौकशी करून त्यांना फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आरोपीने युवतींना प्रेमजाळ्यात ओढून त्यांचे लैंगिक शोषण केले आणि त्याचे चित्रीकरण करून त्यांना ब्लॅकमेल करणे, हा प्रकार अत्यंत गंभीर आहे. हा केवळ वैयक्तिक गुन्हा नसून एका मोठ्या संघटित गुन्हेगारीचा भाग असण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे या प्रकरणात 'महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा' (MCOCA) आणि पीडितांमध्ये अल्पवयीन मुलींचा समावेश असल्याने 'पॉक्सो' (POCSO) कायद्यांतर्गत अत्यंत कठोर कारवाई करण्यात यावी.

**महत्त्वाच्या मागण्या आणि मुद्दे :**

अर्थसाहाय्याची चौकशी: या संपूर्ण प्रकरणातील आरोपींना आणि या रॅकेटला नेमके अर्थसाहाय्य कुठून मि



ळत होते, याची सखोल चौकशी होणे अत्यंत गरजेचे आहे.

पोलीस भूमिकेची चौकशी: सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल होत असताना पोलिसांनी स्वतः हून ('सुओ-मोटो') कारवाई का केली नाही? तसेच सुरुवातीच्या दिरंगाईमुळे मुख्य आरोपीला फरार होण्याची संधी कशी मिळाली, याची चौकशी व्हावी.

फास्ट ट्रॅक कोर्ट: हा खटला जलदगती न्यायालयात चालवून नराधमांना लवकरात लवकर फाशीची शिक्षा मिळवून द्यावी.

व्हिडिओ डिलिशन: सायबर विभागाने तातडीने कारवाई करून सर्व प्लॅटफॉर्मवरून संबंधित व्हिडिओ हटवावेत आणि ते प्रसारित करणाऱ्यांवरही गुन्हे दाखल करावेत.

पीडितांचे संरक्षण: पीडित युवतींची ओळख पूर्णपणे गुप्त ठेवून त्यांना सुरक्षा प्रदान करावी आणि त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी ठोस पावले उचलावीत.

**इतर महत्त्वपूर्ण विषयांवरही प्रशासनाला साकडे:**

या मुख्य विषयाव्यतिरिक्त हिंदु जनजागृती समितीच्या वतीने आणखी एक निवेदन सादर करण्यात आले:

१. कॉर्पोरेट जिहादविरुद्ध कारवाई: नाशिक शहर, जिल्हा आणि राज्यातील इतर शहरांमधील बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये (चछ्ळी) सुरू असलेला 'कॉर्पोरेट जिहाद', हिंदू महिलांवरील अत्याचार आणि कामाच्या ठिकाणी केली जाणारी धार्मिक सक्ती यांविरुद्ध राज्य सरकारने कठोर कायदेशीर पावले उचलावीत, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास हिंदु जनजागृती समिती आणि समस्त हिंदू समाजाच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. नायब तहसीलदार श्री.हरी वीर साहेब यांनी हे निवेदन स्वीकारले.

**निवेदन सादर करतेवेळी उपस्थिती:**

यावेळी हिंदू जनजागृती समितीचे प्रसाद येवले, अनिकेत पेंढारकर, शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे शिवाजी चव्हाण, धर्मनिष्ठ रामकृष्ण ठेंग, शिवसेनेचे गोरक्षक ओम राजे गायकवाड, युवासेनेचे तालुकाप्रमुख गोपीनाथ लहाने, विजय लाहोरकर, गणेश भगत, विशाल भुतेकर, तुषार भुतेकर, संदीप ठेंग आदी राष्ट्र-धर्मप्रेमी कार्यकर्ते उपस्थित होते.




## सोशल मीडियावरही आयपीएलचा फिव्हर !


आयपीएल अर्थात इंडियन प्रीमियर लीगचे हे एकोणिसावे वर्ष आहे. सलग एकोणीस वर्ष आपली लोकप्रियता टिकवून ठेवणारी आयपीएल ही जगातील एकमेव क्रिकेट लीग आहे. गेली अठरा वर्ष केवळ भारतातीलच नाही तर जगातील सर्वाधिक लोकप्रिय क्रिकेट लीग म्हणून आयपीएलकडे पाहिले जाते. जगभरातील अनेक दिग्गज खेळाडू या लीगमध्ये सहभागी होतात. मुळातच क्रिकेटला एका धर्माचे स्थान असलेल्या आपल्या देशात आयपीएल सुरू असल्याने सहभागी संघाचे फॅन फॉलोअर्सची संख्या देखील खूप मोठी आहे. आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करण्यासाठी त्या त्या संघाचे चाहते मैदानावर गर्दी करताना दिसतात. आयपीएलचा सामना कोणत्याही मैदानावर, कोणत्याही शहरांमध्ये असो क्रिकेट रसिकांच्या उदंड प्रतिसादामुळे मैदाने तुडुंब भरली असल्याचे चित्र आपण दरवर्षीच पाहतो मात्र यावर्षी मैदानासोबतच मैदानाबाहेरही आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करण्यासाठी चाहत्यांमध्ये स्पर्धा लागली आहे. आजचे युग सोशल मीडियाचे युग आहे सोशल मीडियाचा वापर न करणारा क्रिकेट चाहता शोधूनही सापडणार नाही. आयपीएलमध्ये सहभागी असणाऱ्या सर्वच्या सर्व म्हणजे दहाच्या दहा संघाचे स्वतंत्र सोशल मीडिया अकाउंट आहेत. प्रत्येक संघाला फेसबुक, इन्स्टाग्राम व ट्विटरवर फॉलो करणारे करोडो फॉलोअर्स आहेत. हे फॉलोअर्स विविध सोशल मिडिया साइटवरून आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करत असतात. आयपीएलची मॅच चालू असताना ट्विट्स, पोस्ट, व्हिडिओज आणि मिम्सचा अक्षरशः पाऊस पडतो. सेकंदाला हजारो ट्विट्स, पोस्ट आणि व्हिडिओज येत असतात. जो तो आपल्या संघाला सपोर्ट करण्यासाठी ट्विट आणि पोस्ट करत असतात. या सर्वांमध्ये मुंबई इंडियन्सचे फॅन फॉलोअर्स सर्वात जास्त आहेत. ट्विटर, फेसबुक आणि इन्स्टाग्राम प्रमाणेच व्हाट्सएपवर देखील चाहते आपल्या संघाला सपोर्ट करीत असतात. आपल्या आवडत्या संघाची मॅच असेल तर चाहते आपल्या संघाला सपोर्ट करण्यासाठी व्हाट्सएपवर स्टेटस ठेवतात. सध्या सोशल मीडियाचं चित्र पाहिलं तर मुंबई इंडियन्स, चेन्नई सुपर किंग व आरसीबी अर्थात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या तीन संघांना सोशल मीडियावर चाहत्यांचा सर्वात जास्त सपोर्ट मिळताना दिसत आहे. खेळाडूंमध्ये सर्वात जास्त सपोर्ट रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अर्थात आरसीबीचा माजी कर्णधार विराट कोहली याला मिळत आहे. आंतरराष्ट्रीय टी २० क्रिकेटमधून निवृत्त झाला तरी विराटची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे हे सोशल मीडियावरुन लक्षात येते. मागील वर्षी चेन्नई सुपर किंग्जच्या महेंद्रसिंग धोनी याला सोशल मीडियावरून सर्वाधिक सपोर्ट मिळाला होता. यावर्षी दुखापतीमुळे तो अद्याप एकही सामना खेळू शकला नाही पण तो जेव्हा मैदानात उतरेल तेव्हा चाहतेही मीडियावर कल्ला करतील यात शंका नाही. विराट कोहली आणि धोनी सारखे जेष्ठ खेळाडूंनाच नाही तर नवख्या खेळाडूंनाही चाहते सपोर्ट करत आहेत. राजस्थान रॉयल्स संघाचा १५ वर्षीय युवा खेळाडू वैभव सूर्यवंशी हा आपल्या धडाकेबाज फलंदाजीने चांगलाच झोतात आला आहे. मैदानाप्रमाणेच तो सोशल मीडियावर देखील झोतात आहे. सोशल मीडियावरून त्याचे कौतुक करताना चाहते थकत नाही. हे झाले खेळाडूंबाबत. संघाच्या बाबतीत विचार करायचा झाला तर आरसबीच्या संघाला सर्वाधिक सपोर्ट मिळत आहे. आरसीबीच्या सामन्याला प्रेक्षकांचा सर्वाधिक प्रतिसाद मिळत आहे. टीव्ही असो की मोबाईल सर्वाधिक पाहिले जाणारे सामने हे आरसीबीचेच असतात. आरसीबीप्रमाणे मुंबई इंडियन्स, राजस्थान रॉयल्स, पंजाब आणि हैद्राबाद या संघांच्या सामन्याला देखील मोठा प्रतिसाद मिळताना दिसतो. यावर्षीची आयपीएल कोणता संघ जिंकणार यावर चाहत्यांमध्ये पैजा लागत आहेत . मॅच संपल्यानंतर मॅचवर आधारित तसेच प्रतिस्पर्धी संघाच्या खेळाडूंच्या खिल्ली उडवणाऱ्या मजेशीर मिम्स बनवून व्हायरल केल्या जात आहे. हे मिम्स बोलके असतात. यातून करमणूक तर होतेच पण संघाची सद्यस्थिती काय आहे हे देखील समजते. चेन्नई, मुंबई आणि कोलकाता हे संघ पॉइंट टेबलमध्ये तळाशी आहेत. पाच वेळेचा विजेता मुंबई फक्त एक सामना जिंकू शकला तर तीन वेळेचा विजेता कोलकाता अद्याप एकही सामना जिंकू शकला नाही. चेन्नईनेही पाच वेळा विजेतेपद मिळवले असले तर त्यांनाही अद्याप सूर गवसलेला नाही त्यामुळे या तीन संघाची आणि त्यांच्या खेळाडूंची सोशल मीडियावर चांगलीच खिल्ली उडवली जात आहे. चाहते सोशल मिडियावर मजेशीर मिम्स, मेसेज करत आपल्या संघाला सपोर्ट करतानाच प्रतिस्पर्धी संघाची खिल्ली उडवून आयपीएलचा फिव्हर आणखी वाढवत आहे. एकूणच केवळ मैदानावरच नव्हे सोशल मीडियावर देखील आयपीएलचा फिव्हर वाढल्याचे दिसत आहे.

– श्याम ठाणेदार

# निसर्गातील बदल आणि माणसाचे वास्तव

निसर्गातील बदल आपल्या पद्धतीने सतत होत राहतात. ऋतुचक्र हे न थांबणारे चक्र आहे. ते अविरतपणे, निर्दयपणे फिरत राहते. प्रत्येक ऋतू आपले सौम्य ते उग्र रूप दाखवत पुढे सरकत असतो. उन्हाळा आता आपल्या ऐन भरात आला आहे. महाराष्ट्रातील अनेक शहरांत सध्या ४०ओ सेल्सिअसच्या पुढे तापमान नोंदवले जात आहे.

वृत्तपत्रांमध्ये उष्णतेचे वर्णन करणाऱ्या शब्दरचना गमतीशीर वाटतात, पण त्या उन्हाची तीव्रता स्पष्ट करण्यास पुरेशा असतात. सूर्य अक्षरशः आग ओकत आहे, उन्हाचा आगडोंब उसळला आहे, अंगाची लाही–लाही होत आहे, उष्णतेची लाट आली आहे, अमुक शहर होरपळून निघत आहे अशा बातम्यांमधून वाढत्या तापमानाचे चित्र उभे राहते. या शब्दरचनांमुळे मनाला थोडासा का होईना, थंडावा मिळतो.पण प्रत्यक्षात सर्वसामान्य जनतेची अवस्था मात्र बिकट झाली आहे. जंगलातील प्राणीमात्रांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही. अनेक ठिकाणी पाण्यासाठी वणवण




भटकावे लागते. पक्षी तहानेने व्याकूळ होतात. कष्टकरी वर्गाला उन्हातच श्रम करावे लागतात. शेतकरी, बांधकाम मजूर, रस्ते कामगार, वाहतूक कर्मचारी, स्वयंपाकी, कारखान्यातील कामगार यांच्यासाठी उन्हाळा म्हणजे शरीराला पीडा देत जगण्याची वेळ होय.

पावसाळ्यातील अतिवृष्टी, हिवाळ्यातील थंडीची लाट आणि उन्हाळ्यातील विक्रमी तापमान हे सर्व मानवाला निसर्गाने दिलेले इशारे आहेत. निसर्ग जणू सांगत असतो, माझी कृपादृष्टी तुझ्यावर आहेच; पण माझी वक्रदृष्टीही लक्षात ठेव. म्हणूनच कधी तो पावसाच्या रूपाने, कधी थंडीच्या लाटेने, तर कधी उष्णतेच्या तडाख्याने आपली ताकद दाखवून देतो. माणसानेही स्वतःच्या सुखासाठी निसर्गावर अनेक प्रकारे आघात केले आहेत. झाडांची तोड करून काँक्रीटची जंगले उभी केली. मोकळी मैदाने, जलस्रोत आणि शेतीची जमीन नष्ट केली. उष्णतेपासून बचाव करण्यासाठी पंखे, कुलर, एसी अशी साधने निर्माण केली. आज तो गर्मी में भी थंडी का एहसास घेत जगत आहे. पण हे करताना पृथ्वीचे तापमान वाढवण्यात आपलाही मोठा वाटा आहे, हे तो विसरतो.

बर्फाचे गोळे, आईस्क्रीम, थंड पेये यांचा आस्वाद घेताना माणूस ऋतुमानानुसार बदलणाऱ्या बाजारू जीवनशैलीचा गुलाम होत चालला आहे. आजचा माणूस कृत्रिम आणि नैसर्गिक जीवनशैली यांच्या मधोमध हेलकावे खात जगत आहे. कोणताही नैसर्गिक प्रकोप सर्वाधिक त्रास तळागाळातील माणसालाच देतो. श्रीमंत माणूस वातानुकूलित घरात बसून उन्हाचा सामना करू शकतो; पण गरीबाला उन्हातच राबावे लागते. त्यामुळे निसर्गाचे संकट हे सर्वांना समान नसते, ही वस्तुस्थिती लक्षात घेतली पाहिजे.

उन्हापासून बचाव करण्यासाठी दुपारी बाहेर न पडण्याच्या सूचना दिल्या जातात; पण रोजंदारीवर जगणाऱ्यांसाठी त्या व्यर्थ ठरतात. जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे या म्हणीप्रमाणे, एकाच ऋतूचा अनुभव प्रत्येकासाठी वेगळा असतो. कोणासाठी उन्हाळा सुट्ट्यांचा आनंद असतो, तर कोणासाठी जगण्यासाठीचा संघर्ष.

आज गरज आहे ती निसर्गाशी संघर्ष करण्याची नाही, तर निसर्गाशी मैत्री करण्याची. वृक्षलागवड, पाण्याची बचत, प्रदूषण कमी करणे, पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे आणि संसाधनांचा संयमी वापर करणेही काळाची गरज आहे.लवकरात लवकर वाढत्या तापमानाची तीव्रता कमी व्हावी, वातावरण सुसह्य व्हावे आणि सर्व सजीवांना दिलासा मिळावा, हीच प्रार्थना.निसर्ग हा शत्रू नाही, तो आपला जीवनदाता आहे. त्याचा सन्मान करूया, त्याचे रक्षण करूया आणि त्याच्या चरणी कृतज्ञतेने नतमस्तक होऊया.

**– किशोर जाधव, सोलापूर**
**– मो. नं. ९९२२८८२५४१**

# कोठे नेहून ठेवला महाराष्ट्र माझा..?






रोजच वर्तमानपत्र वाचलं वृत्तवाहिन्या पाहिल्या तसेच समाज माध्यमावर फेरफटका मारला तरी महाराष्ट्राच्या अब्रुचे धिंडवडे निघालेले दिसतील. काय चाललंय महाराष्ट्रात, असा प्रश्न राज्याच्या कानाकोपऱ्यातून विचारला जात आहे. महाराष्ट्रात ड्रग्जमाफियांनी घट्ट पाय रोवले आहेत आणि लैंगिक शोषण सहज केले जात असल्याचे संदेश सर्वत्र जात आहे. गुन्हेगारांना कडक शासन केले जाईल, कुणालाही मोकळे सोडले जाणार नाही, चौकशीअंती सत्य बाहेर येईल हे शब्द आता गुळमुळीत झाले आहेत. कारण रोज नवीन धक्कादायक प्रकरणे बाहेर येत आहेत आणि सरकारची अब्रू चव्हाट्यावर मांडली जात आहे. एवढे होऊन सर्वकाही आलबेल असल्याचे मंत्री, नेते आणि त्यांच्या समर्थकांना वाटत असेल तर ते आपण कुठल्या नंदनवनात वावरत आहोत, याचा विचार करण्याची गरज आहे. गोरेगावच्या नेस्को सेंटरमध्ये कॉन्सर्टआडून रेव्ह पार्टी होते आणि पोलिसांना याची खबरही नसते, यावर कुणाचा विश्वास बसू शकतो का? नेस्को सेंटरमध्ये हजारो तरुण येतात, खुलेआम ड्रग्जचे सेवन करतात, त्यात दोघांचा बळी गेल्यावर सरकारी यंत्रणा जागी होते. मग या अपयशाचे खापर कुणावर फोडायचे ? राज्यात अमली पदार्थाची खुलेआम विक्री होत आहे.

नेस्कोमधील ड्रग्ज पार्टीचे प्रकरण बाहेर येताच अंधेरीत एका भाड्याच्या खोलीतील ड्रग्जची फॅक्टरी पोलिसांनी उद्धवस्त केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच गृहखात्याची जबाबदारी आहे. त्यांनी ड्रग्जची पाळेमुळे खोदण्यासाठी कंबर कसली आहे. ड्रग्ज पकडले जात आहेत, हे पोलिसांचे यश मानले तरी ड्रग्जच्या फॅक्टरीचे सूत्रधार कोण, ड्रग्जची खुलेआम विक्री कशी होते याची उत्तरे मिळत नाहीत. ठाणे पोलिसांनी यंदा जानेवारीमध्ये २७ कोटी २१ लाखांचे एमडी ड्रग्ज मुंब्रा परिसरात जप्त करून पाच जणांना अटक केली होती. सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यामधील पाचुपतेवाडीतून यंदा जानेवारीत महसूल गुप्तचर संचालनालयाने तब्बल ६ हजार कोटींचे एमडी ड्रग्ज जप्त केले होते. तर डिसेंबर २०२५ मध्ये याच सातारा जिल्ह्यामधील सावरी गावातील शेडवर मुंबई पोलिसांनी छापा टाकत ४५ किलोचा म्हणजेच तब्बल १४५ कोटी रुपयांचा ड्रग्जचा साठा जप्त केला होता. या प्रकरणांचे पुढे काय झाले, यांच्यावर राजकीय वरदहस्त होता का, हे अजून स्पष्ट झालेले नाही. नाशिकमधील एमआयडीसीमधील ललित पाटीलची ड्रग्ज फॅक्टरी ऑक्टोबर २०२३ मध्ये साकीनाका पोलिसांनी उद्धवस्त करून ३०० कोटींचे १५० किलो ड्रग्ज जप्त केले होते. हाच ड्रग्जमाफिया २ ऑक्टोबर २०२३ मध्ये पुण्याच्या ससून रुग्णालयातून फरार झाला होता. त्याला १५ दिवसांनी चेन्नईमधून अटक करण्यात आली. त्यानंतर या प्रकरणाचे काय झाले, याची फारशी माहिती बाहेर आली नाही. राज्यात गुटखाबंदी असताना खुलेआम विक्री होते. ड्रग्जचेही असेच झाले आहे. त्यामुळे उडता महाराष्ट्र, अशी महाराष्ट्राची प्रतिमा होत आहे.

ड्रग्जचे आव्हान पेलत असताना लैंगिक शोषण, अत्याचाराच्या घटनांमुळे महाराष्ट्राची प्रतिमा अत्यंत मलीन होत आहे. भोंदूबाबा अशोक खरातचे प्रकरण सध्या खूपच चर्चेत आहे. त्याने महिलांना फसवून त्यांच्यावर केलेले लैंगिक अत्याचार, जमवलेली आर्थिक माया आणि या सर्वांवर असलेला राजकीय वरदहस्त लपून राहिलेला नाही. अनेक संसार उद्धवस्त करणाऱ्या या लिंगपिसाट भोंदू खरातला कठोरातील कठोर शिक्षा व्हायला हवी. मात्र, या प्रकरणात खरातची पत्नी फरार झाली आहे. ज्यांच्यावर आरोप झाले त्यांची अजून चौकशीही झाली नाही. त्यामुळे जरी एसआयटीकडून चौकशी सुरू असली तरी याचा तपास खरंच गांभीर्याने होत आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. खरात फाईल्स सुरू असतानाच नाशिकमधील एका मल्टीनॅशनल कंपनीतील लैंगिक शोषण आणि धर्मांतर प्रकरण समोर आले. हे प्रकरणही खरात फाईल्सएवढेच गंभीर आहे. पोलिसांनी आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. लक्षात आलेली बाब म्हणजे यातील आरोपी मुस्लीम आहेत. त्यानंतर अमरावतीमध्ये एका युवकाने १८० लैंगिक अत्याचार केल्याचे आणखी एक धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. याने त्यांचे साडेतीनशे व्हिडिओ बनवून व्हायरल केले आहेत. यातील आरोपीही मुस्लीम आहेत. ही तिन्ही प्रकरणे महाभयंकर असून यातील कुठलेही आरोपी सुटता कामा नयेत.

मात्र, इथे आरोपींमध्ये धार्मिक भेदभाव केल्याचे चित्र दिसत आहे. खरात प्रकरणात भाजपकडून विधाने करणे टाळली जात होती. मात्र, नाशिक आणि अमरावतीमधील लैंगिक शोषण आणि धर्मांतराचा मुद्दा आल्यानंतर भाजप अचानक जास्तच आक्रमक झाला आहे. त्यांचे आमदार–खासदार बोलू लागले आहेत. मुळात महिलांवरील अत्याचार हा कुठल्याही जात–पंथ–धर्मापुरता विषय असू शकत नाही. एखाद्यावर आरोप झाल्यानंतर तो कोणत्या पक्षाचा आहे, याची चर्चा आपल्याकडे पहिल्यांदा होते. त्यानंतर त्याच्या पक्षाला त्या गुन्ह्याशी जोडले जाते. हे चुकीचे असून त्याचा पायंडा पडला आहे. राज्यात लैंगिक अत्याचारांच्या घटना उघडकीस येत आहेत, ड्रग्ज पकडले जात आहेत. याचा अर्थ गुन्हेगारांची हिंमत वाढली आहे, असाच होतो. गुन्हे करण्याची हिंमत होणार नाही, एवढी आपली पोलीस यंत्रणा सक्षम असायला हवी. दुर्दैवाने राजकीय दावणीला पोलीस बांधले गेल्याचे चित्र दिसत आहे. म्हणूनच उडता महाराष्ट्र आणि बुडता महाराष्ट्र ही निर्माण होणारी प्रतिमा तातडीने पुसून टाकण्याची गरज आहे. कारण महाराष्ट्राच्या नावामागे आजही पुरोगामी असे बिरुद आहे, ते पुसले जाणार नाही, याची काळजी सरकारने घ्यायला हवी.

## चैत्र गौरी

बसविल्या चैत्र गौरी
सजविल्या घरोघरी
उधाण ये उत्साहाले
हो चैत्रोत्सव परोपरी

हळदीकुंकूसोहळ्यां
नटून चालल्या नारी
आगत स्वागत करी
रांगोळी शोभते दारी

निमित्ते वनिता येती
ग्रीष्मां सुखाच्या सरी
सुसंस्कृतीपाहुणचारी
उन्हाला किनारहसरी

आरासदेवते सामोरी
सजावट ती मनोहारी
वाटलीडाळ बहुगुणी
चव सुखद जिव्हेवरी

गं चटकदार थंडपन्हे
बहुऔषधी कितीतरी
तहान भागली भेटीने
थकल्या मना तरतरी

ओटीमध्ये भरे हरबरे
वाण देती सोपस्कारी
प्रसन्नहोई पार्वती हरी
वरिष्ठ जना नमस्कारी

अक्षय्य तृतीये सांगता
गौरीघरी जाई माघारी
सु सह्य सोसू उन्हाळा
पुनश्च येई श्रावणसरी

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक ... बातमी

# नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांचा पत्रकारांशी सुसंवाद



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि १७, नवी मुंबई :** नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी आज महापालिका मुख्यालयातील पत्रकार कक्षाला भेट देत विविध वृत्तपत्र व वृत्तचित्रवाहिनी प्रतिनिधींशी संवाद साधला. लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांच्या माध्यमातून विविध प्रकारची माहिती नागरिकांपर्यंत पोहचत असते, त्यामुळे पत्रकारांची भूमिका महत्वाची असल्याचे सांगत पत्रकारांनी यावेळी मांडलेल्या विविध बाबींवर तत्परतेने कार्यवाही करण्याचे निर्देश महापौरांनी दिले. याप्रसंगी विविध वृत्तपत्र व वृत्तचित्रवाहिनी यांचे प्रतिनिधी आणि कॅमेरामन उपस्थित होते.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



## थोडक्यात

# काटोल येथे साहित्य संवाद मेळावा उत्साहात संपन्न




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१७, काटोल (नागपूर) :** महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंती निमित्त साधून काटोल योगा सेंटर येथे साहित्य संवाद मेळाव्याचे आयोजन प्रा. वीरेंद्र इंगळे, प्रवीण ढोकणे सामाजिक कार्यकरते यांचे पुढाकाराने करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिध्द साहित्यिक समीक्षक प्रा डॉ. सतीश महल्ले होते. प्रमुख पाहुणे जयाताई बोरकर, सुनील गजबे, लक्ष्मणराव मेहर आदी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे लेखक डॉ.रवी दलाल हे मार्गदर्शक आवर्जून उपस्थित होते. त्यांनी ज्येष्ठ नवोदित कवी यांना साहित्यातील अडचणी व प्रवाह या संदर्भात मार्गदर्शन केले. संत साहित्य, विद्रोही साहित्य यामधील बारकावे समजून सांगितले. कविता, मुक्तछंद, गझल, भारुड, अभंग यामधून लेखकांनी परिवर्तनवादी साहित्याची निर्मिती करावी असे आव्हान केले.काटोल शहरातील जगविरव्यात लेखक दिवंगत वामनराव इंगळे यांना आदरांजली वाहिली कुंतलापुर ज्ञानार्जन केंद्राचे नामविस्तार करून वामनराव इंगळे कुंतलापुर ज्ञानार्जन केंद्र असा नामविस्तार करण्यात यावा अन्यथा साहित्यिकांनी उपोषणाला बसण्याचा इशारा दिला. जयाताई बोरकर यांनी जीवनामध्ये वादळ, संघर्ष असल्यामुळे साहित्य तावून सुलाखून निघते असे प्रतिपादन केले. आयोजनाचा साहित्य प्रेमिनी आनंद घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.सतीश महल्ले यांनी साहित्यातील वेदना दुःखे संघर्ष दर्शविला. कार्यक्रमात आलेल्या कवींनी आपापल्या कवितांचे सादरीकरण केले व कार्यक्रमात रंगत आणली. उपस्थित लेखक कवींमध्ये प्रा. उमराव नारनवरे , प्रा प्रेमकुमार सोमकुवर, कवयित्री सरिताताई रामटेके, मीनाताई पाटील, मीनल सोमकुवर, सुनील गजबे, प्रतिभा पाटील, वनिता बागडे, अश्विनी बागडे, श्रीमती संगीता वाढबुधे, आनंत सोमकुवर, नरेंद्र राऊत, कृष्णा गवईकर, प्रा.रवींद्र सोमकुवर, प्रणय चौहान, श्रीकांत गौरखेडे, गराडकर, नामदेवराव नेहारे, वऱ्हाडी कवी सुरेश राठोड प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा.वीरेंद्र इंगळे यांनी केले तसेच आभार प्रदर्शन प्रवीण ढोकणे यांनी केले.

# बिलोलीत स्वस्त धान्य दुकानातून निकृष्ट तांदूळ

## नगरसेविका गायकवाड यांची तक्रार



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१७, बिलोली (नांदेड) :** बिलोली तालुक्यातील तसेच शहरातील गोरगरीब नागरिकांना सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत स्वस्त धान्य दुकानातून निकृष्ट दर्जाचा तांदूळ मिळत असल्याच्या तक्रारींना उधाण आले आहे. या प्रकरणी नगर परिषद बिलोलीच्या नगरसेविका अनुपमा महेंद्र गायकवाड यांनी जिल्हा पुरवठा विभागाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.मिळणारा तांदूळ तुटलेला, धुळकट, कधी कधी दगड-माती मिश्रित असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. काही ठिकाणी तांदळाला वास येत असल्याने तो वापरण्यास अयोग्य ठरत आहे. त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण असून, अनेकांनी याबाबत वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याची खंत व्यक्त केली आहे.विशेष म्हणजे, स्वस्त धान्य दुकानातून मिळणाऱ्या अन्नधान्यावरच अनेक कुटुंबांचे उदरनिर्वाह अवलंबून आहे. अशा परिस्थितीत निकृष्ट धान्य मिळाल्यास त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींना अशा अन्नधान्यामुळे अधिक धोका निर्माण होऊ शकतो.यासंदर्भात गायकवाड यांनी तहसीलदार तसेच जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बिलोली तालुक्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानांची तात्काळ तपासणी करण्यात यावी. धान्य साठवण, वितरण प्रक्रिया आणि गुणवत्तेची पाहणी करून दोषी आढळणाऱ्या दुकानदारांवर कडक कारवाई करावी. तसेच पुढील काळात अशा प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी नियमित तपासणी यंत्रणा कार्यान्वित करावी.तसेच नागरिकांना दर्जेदार तांदूळ व गहू योग्य प्रमाणात आणि वेळेत मिळावा. यासाठी पुरवठा विभागाने विशेष लक्ष द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, या प्रकरणाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने योग्य तो निर्णय घ्यावा, अन्यथा नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नगरसेविका सौ. गायकवाड यांनी दिला आहे.


# भांडवली या गावची भैरवनाथ यात्रा उत्साहात संपन्न



**अक्षराज : अमोल सूर्यवंशी**

**दि.१७, माण (सातारा) :** माण तालुक्यात असणारे भांडवली गाव या ठिकाणी भैरवनाथ यात्रा दरवर्षीप्रमाणे उत्साहात साजरी केली जाते. देवाची लग्न लागल्यानंतर पालखीतून देवाची मिरवणूक काढली जाते व चैत्र अमावस्या दिवशी कुस्तीचे जंगी सामने खेळले जातात. यावर्षी कुस्ती खेळण्यासाठी महिला गटातील पंधरा वर्षाची वैष्णवी शिनगारे येळेवाडी येथील कन्या हिने बालगटात दोन हजाराची कुस्ती खेळून मान पटकावला. व भांडवली यात्रा कमिटीने तिचे स्वागत केले.

# रांजणगाव मशिद येथे १३५ वी आंबेडकर जयंती साजरी



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१७, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील रांजणगाव मशिद येथील ग्राम पंचायतीच्या वतीने, सर्व समाज संघटीत करुन, भारतीय राज्यघटनेचे सिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.

पारनेर तालुक्यातील तरुणांचां आधारवड, एक हाक्काचा माणुस, रात्र दिवस समाजसेवेत वाहुन घेणारा, समाज सेवेचा वारसा जपनारा एकमेव म्हणजे रांजणगावचे भुषण, भाजपाचे पारनेर तालुका अध्यक्ष, पारनेर तालुका जलसंधारण समिती सदश्य राहुल शिंदे पाटील यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पन करुन विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमासाठी गावचे सरपंच महेश देशमुख, उपसरपंच शिवाजी शिंदे, मा, सरपंच शरद सरोदे, बंटी साबळे, बाबा जवक सेवा सोसायटीचे चेअरमन अनिल जवक, तालुका दुध संघाचे भिमराव शिंदे, अरुण देशमुख, शिवदास मेहेत्रे, योगेश घुले, सुखदेव गाढवे, भाउसाहेब देशमुख, प्रा.चंद्रकांत शिंदे, नंदकुमार शिंदे, आर पी इकडे, प्रताप थोरात, भाउ येणारे, शुभंम जवक, अमृत महाराज इकडे आदी ग्रामस्त मोठ्या संखेने उपस्थित होते.

# थर्ड पार्टी मॉनिटरिंगच्या माध्यमातून प्रदूषण नियंत्रणाची काटेकोर अंमलबजावणी करणार - पंकजा मुंडे




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषणाच्या गंभीर प्रश्नावर विधानसभेत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चेसह विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करत आज चंद्रपूर जिल्ह्यात सविस्तर प्रदूषण पाहणी दौरा केला. या दौऱ्यामुळे चंद्रपूरच्या प्रदूषण प्रश्नावर राज्य सरकारची ठोस भूमिका आणि पुढील कारवाईची दिशा स्पष्ट झाली आहे.

या पाहणी दौऱ्यादरम्यान मंत्री पंकजा मुंडे यांनी आ. मुनगंटीवार यांच्यासह ऊर्जानगर वसाहत परिसरात वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड आणि चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र यांच्या कोळसा हाताळणी प्रकल्प व कोळसा बंकरमुळे निर्माण होणारे प्रदूषण प्रत्यक्ष पाहिले. उघड्यावरून वाहून नेला जाणारा कोळसा, हवेत उडणारी राख व धूर यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे त्यांनी निरीक्षण केले. यानंतर त्यांनी बेलसनी परिसरातील कोल वॉशरीजमुळे होणाऱ्या प्रदूषणाची पाहणी केली. शेतकऱ्यांच्या शेतांवर पडणारी कोळशाची धूळ, पिकांचे नुकसान आणि जमिनीची होत असलेली हानी याबाबत स्थानिकांनी मंडलेल्या समस्या त्यांनी ऐकून घेतल्या. झरपट नदी परिसरात ही जाऊन त्यांनी नदीतील प्रदूषण, गाळ साचणे आणि पाण्याच्या गुणवत्तेतील घसरण याचा आढावा घेतला.

पाहणी दौऱ्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांचे आभार मानत अत्यंत ठोस व परिणामकारक मागण्या मांडल्या. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, केवळ पाहणीपुरते मर्यादित न राहता या बैठकीचे इतिवृत्त तातडीने अंतिम करून मुंबईत उच्चस्तरीय आढावा बैठक घ्यावी, जेणेकरून निर्णयांची अंमलबजावणी वेळेत होईल.

कोल वॉशरीजमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, तहसीलदार, कृषी विभाग व प्रदूषण नियंत्रण विभागाच्या संयुक्त समितीने दिलेल्या अहवालानुसार तातडीने नुकसानभरपाई देणे आवश्यक आहे, अशी ठाम मागणी त्यांनी केली. यासोबतच प्रदूषण नियंत्रण विभागातील काही अधिकाऱ्यांना संबंधित कायद्याचे पुरेसे ज्ञान नसल्याचे निदर्शनास आणून देत, सक्षम व तज्ज्ञ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

झरपट नदीच्या पुनरुज्जीवनासाठी पहिल्या टप्प्यात डीपीआर तयार करण्यासाठी 'निरी' या संस्थेला तातडीने सूचना द्याव्यात तसेच आयआयटी पवई व निरी यांच्या संयुक्त समितीकडून प्रदूषणाबाबत तीन महिन्यांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली. याशिवाय, उद्योगांमध्ये प्रदूषणाचे प्रमाण जनतेसमोर पारदर्शकपणे मांडण्यासाठी मॉनिटरिंग डिस्प्ले बोर्ड लावण्याची सूचना त्यांनी केली.

प्रदूषण नियंत्रणासाठी स्वतंत्र स्थायी समिती गठित करावी, उघड्यावर असलेल्या कोळशाच्या साठ्यासाठी कोलडोम किंवा कव्हर्ड शेड उभारावेत, तसेच कोल हँडलिंग प्लांट बंदिस्त करावा किंवा पर्यायी व्यवस्था निर्माण करावी, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

ग्रीन बेल्ट डेव्हलपमेंट अंतर्गत 'मिया वाकी' पद्धतीने वड, पिंपळ, कडूलिंब यांसारख्या वृक्षांची घनदाट लागवड करावी, नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम अंतर्गत निधी चंद्रपूर जिल्ह्यासाठी उपलब्ध करून द्यावा आणि आगामी उच्चस्तरीय बैठकीस वेकोली व महानिर्मितीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना अनिवार्यपणे उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे, अशीही त्यांनी मागणी केली.

बैठकीत बोलताना पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी अत्यंत स्पष्ट शब्दांत सांगितले की, चंद्रपूरमध्ये प्रदूषणाची तीव्रता प्रचंड आहे, हे आज प्रत्यक्ष पाहणीदरम्यान जाणवले. काही ठिकाणी प्रदूषण लपवण्याचा प्रयत्न होत असल्याचेही दिसून आले; मात्र प्रदूषण लपवून चालणार नाही, अशा प्रकारांना आम्ही अजिबात सहन करणार नाही. शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत असताना त्यांना नुकसानभरपाई न देण्याचा प्रकार गंभीर असून तो खपवून घेतला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. दौऱ्यात दिलेल्या सर्व सूचनांची ठराविक कालमर्यादेत अंमलबजावणी होईल यावर स्वतः लक्ष ठेवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, तसेच थर्ड पार्टी मॉनिटरिंगद्वारे प्रदूषण नियंत्रणाची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल, असे सांगत त्यांनी प्रशासनाला स्पष्ट संदेश दिला.

झरपट नदीच्या खोलीकरण व सौंदर्यीकरणासाठी महानगरपालिकेने तातडीने पावले उचलावीत, तसेच नदी पुनर्जीवन प्राधिकरण स्थापन होताच इरई व झरपट या नद्यांचा पहिल्या टप्प्यात समावेश करण्यात येईल, अशी घोषणा ही त्यांनी केली.

या बैठकीस आ.देवराव भोंगळे, जिल्हाधिकारी वसूमना पंत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, महापौर संगीता खांडेकर, मनपा आयुक्त अकुनुरी नरेश तसेच राहुल पावडे, बंडू गौरकर आदींची उपस्थिती होती.

# परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांनी ४०० अधिक लोकांच्या तक्रारीचे केले निवारण



**अक्षराज : घ्यानश्याम आंबोकर**

**दि.१६, मिरा भाईंदर :** परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली आज हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे कळदालन, मिरा भाईंदर येथे लोकदरबाराचे आयोजन करण्यात आले. सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत चाललेल्या या लोकदरबाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या लोकदरबारात मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त राधा विनोद शर्मा, तहसीलदार निरंजन गौड, पोलीस उपआयुक्त तसेच शासनाच्या विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी नागरिकांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी उपस्थित होते.

दुपारी १ वाजेपर्यंत ३३८ नागरिकांनी मंत्री महोदयांकडे प्रत्यक्ष भेटून आपल्या समस्या मांडल्या. मंत्री प्रताप सरनाईक यांनी प्रत्येक तक्रार गांभीर्याने ऐकून घेतली आणि संबंधित अधिकाऱ्यांना जागेवरच बोलावून तक्रारींचे निराकरण करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. अर्ज स्वीकारणाऱ्या कर्मचाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ४०० पेक्षा जास्त नागरिकांनी टोकन घेऊन आपल्या तक्रारी नोंदवल्या.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे कलादालन नागरिकांनी पूर्णपणे भरले होते. रस्ते, पाणी, अतिक्रमण, नागरी सुविधा यांसह विविध विषयांवरील तक्रारींचे यावेळी निवारण करण्यात आले. शासन आपल्या दारी या संकल्पनेनुसार हा लोकदरबार यशस्वी झाला. मंत्री सरनाईक लोकदरबार प्रत्येक महिन्याला घेणार असे जाहीर केले.

# मुंबई उपनगर जिल्ह्यात ८६९ रुग्णांना सुमारे ८.१० कोटींची मदत




**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१७, मुंबई :** शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यात आर्थिक वर्षात ८६९ रुग्णांना सुमारे ८ कोटी १० लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

**२० गंभीर आजारासाठी मदत**

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

**सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळा...**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

**आर्थिक वर्षातील मदत**

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत मुंबई उपनगर जिल्ह्यातील ८६९ रुग्णांना सुमारे ०८ कोटी १० लाख ४४ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या जिल्हा कक्ष, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, सामंजस्य करार आदीमुळे रूग्णांना वेळेत अर्थसहाय्य होत आहे. गरजू रूग्णांनी योजनेचा लाभ घेण्याकरिता आणि अधिक माहितीकरिता १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# रिक्षा वाटपात गोंधळ; उपोषणकर्त्या चालकांचा संताप उफाळला

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१७, माथेरान :** माथेरानमध्ये हातरिक्षा बंद करून ई-रिक्षांच्या माध्यमातून रिक्षा चालकांचे पुनर्वसन करण्याच्या प्रक्रियेत मोठा विलंब होत असल्याने परवानाधारक रिक्षा चालकांमध्ये नाराजी वाढत आहे. उपोषण करूनही न्याय न मिळाल्याची भावना व्यक्त करत, ई-रिक्षा वाटप प्रक्रियेत पारदर्शकता नसल्याचा आरोप होत असून भाजप कार्यकर्तेही या प्रकरणात आक्रमक झाले आहेत.हातरिक्षा ही अमानवीय प्रथा बंद करण्यासाठी अनेक वर्षे संघर्ष केल्यानंतर सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया च्या आदेशानुसार एकूण ९४ परवानाधारक चालकांना ई-रिक्षा देण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात केवळ २० चालकांनाच ई-रिक्षा मिळाल्या असून उर्वरित ७४ जणांचे पुनर्वसन अद्याप प्रलंबित आहे. सहा महिन्यांत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश असतानाही नऊ महिने उलटून गेले तरी अंमलबजावणी झालेली नाही. याच पार्श्वभूमीवर, १६ एप्रिल रोजी नगरपरिषदेच्या ताब्यातील चार जुन्या ई-रिक्षा कोणत्याही जबाबदार अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीत काही निवडक चालकांना देण्यात आल्याचा आरोप आहे. यामुळे उपोषणकर्त्या रिक्षा चालकांमध्ये संताप व्यक्त होत असून ही प्रक्रिया संशयास्पद असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी उपोषणकर्त्यांनी प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत भाजपमध्ये प्रवेश केला होता. मात्र, त्यांच्याच मुद्द्यावर अन्याय होत असल्याची भावना निर्माण झाल्याने स्थानिक भाजप कार्यकर्तेही आक्रमक झाले आहेत. माजी नगरसेवक प्रदीप घावरे यांनी सांगितले की, परवानाधारक रिक्षा चालकांना न्याय मिळवून देण्यासाठी भाजप ठामपणे उभी राहील. सध्या पर्यटन हंगाम मंदावलेला असताना रिक्षा, घोडे आणि रस्त्यांचे प्रश्न यावरच राजकारण रंगत असल्याची चर्चा आहे. मात्र, पर्यटनवाढीसंदर्भात लोकप्रतिनिधी मौन बाळगत असल्याची टीका होत आहे. काही अधिकारी वर्गावरही ई-रिक्षा विषयाला बगल देत राजकीय हस्तक्षेपाला खतपाणी घालण्याचे आरोप होत आहेत.




विशेष म्हणजे, ई-रिक्षा सुविधेचा वापर मोठ्या प्रमाणात होत असताना, या प्रकल्पाला विरोध करणारी काही मंडळीच त्याचा लाभ घेत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे विरोध आणि वापर अशी दुहेरी भूमिका घेतली जात असल्याची टीका स्थानिकांकडून होत आहे.रिक्षा चालकांचे म्हणणे आहे की, ई-रिक्षा वाटप करताना कोणताही भेदभाव न करता सर्व ९४ परवानाधारकांना समान संधी देण्यात यावी. गरजवंत किंवा आर्थिक स्थिती पाहून नव्हे, तर परवान्याच्या आधारे सर्वांना न्याय मिळायला हवा, अशी मागणी त्यांनी केली आहे. उपोषणकर्ते संतोष लखन यांनी सांगितले की, २३ मार्चपासून सुरू केलेल्या उपोषणावेळी प्रशासनाने पारदर्शकतेचे आश्वासन दिले होते. मात्र, १६ एप्रिल रोजी आम्हाला विश्वासात न घेता चार ई-रिक्षा वाटप करण्यात आल्या, त्यामुळे संपूर्ण प्रक्रियेवर संशय निर्माण झाला आहे. तर रिक्षा चालक दिप्ती सुतार यांनीही प्रशासनावर विश्वासघाताचा आरोप करत, आमरण उपोषण मागे घेताना दिलेले आश्वासन पाळले गेले नाही. कोणताही अधिकारी उपस्थित नसताना राजकीय दबावाखाली ई-रिक्षा वाटप झाले, असे सांगितले. दरम्यान, या प्रकरणी परवानाधारक रिक्षा चालकांसह भाजप कार्यकर्त्यांनी नगरपरिषद कार्यालयात धाव घेतली असून संबंधित अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरणाची मागणी केली जात आहे.

## थोडक्यात

### खापरखेडा वीज केंद्रात आंबेडकर जयंती उत्साहात

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.१७, नागपूर :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त खापरखेडा येथील ५०० मेगावॅट औष्णिक वीज केंद्रात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कोळसा हाताळणी (सीएचपी) विभागातील कंत्राटी कामगारांनी पुढाकार घेत त्रिमूर्ती इंजिनियरिंग सर्व्हिसेस स्टोअर येथे कार्यक्रम पार पडला. डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. सीएचपी विभागाचे कार्यकारी अभियंता भट व सहाय्यक कार्यकारी अभियंता फुटाणे यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. यावेळी उपस्थित अधिकारी, अभियंते व कर्मचाऱ्यांनी बाबासाहेबांच्या कार्याला अभिवादन केले. वक्त्यांनी आपल्या मनोगतात डॉ.आंबेडकर यांनी शिक्षण, समता व सामाजिक न्यायासाठी दिलेल्या लढ्याचा गौरव केला. भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीत त्यांनी बजावलेली भूमिका आणि वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेले कार्य आजही मार्गदर्शक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाला वीज केंद्रातील अधिकारी, कर्मचारी व कंत्राटी कामगारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमानंतर भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. कंत्राटी कामगारांच्या पुढाकारामुळे परिसरात उत्सवी व प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

### नेरळ माथेरान मिनी ट्रेनला ११९ वर्ष पूर्ण, इतिहास समस्यांवरील लक्ष

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**



**दि.१७, माथेरान :** नेरळ-माथेरान मिनी ट्रेन सेवेने ११९ वर्षांचा ऐतिहासिक टप्पा पूर्ण केला असून या रेल्वेमार्गाचा गौरवशाली इतिहास पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. सर आदमजी पिरभॉय यांच्या दूरदृष्टीतून साकारलेल्या या प्रकल्पाची सुरुवात सन १९०१ मध्ये झाली आणि १५ एप्रिल १९०७ रोजी या मार्गावर मिनी ट्रेन सेवा सुरू झाली.

सुमारे २१ किलोमीटर लांबीचा हा नेरो गेज मार्ग कठीण घाट परिसरातून उभारण्यात आला असून त्या काळात तो मोठा अभियांत्रिकी पराक्रम मानला जातो. सर आदमजी पिरभॉय यांनी स्वतःच्या खिशातून मोठा खर्च करून हा प्रकल्प पूर्ण केल्यामुळे माथेरानच्या पर्यटनाला मोठी चालना मिळाली.

दरम्यान, माथेरान रेल्वेच्या विविध समस्यांबाबत योग्य मार्गदर्शन आणि तक्रारी वरिष्ठ पातळीवर मांडून रेल्वे सेवा अखंड सुरू राहावी तसेच तिचा विस्तार व्हावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते जनार्दन पारते हे सातत्याने रेल्वे अधिकाऱ्यांशी चर्चा व पाठपुरावा करत आहेत. रेल्वेच्या ११९ वर्षांच्या पूर्णत्वाची आठवणही त्यांनी सोशल मीडियावर मांडली आहे.

आजही नेरळ-माथेरान मिनी ट्रेन ही इतिहास, परंपरा आणि पर्यटनाचे महत्त्वाचे प्रतीक म्हणून ओळखली जात असून तिचे जतन व विकास होणे आवश्यक असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# अक्षयतृतीया पार्श्वभूमीवर बालविवाह रोखण्यासाठी प्रशासन सज्ज

## बालविवाह रोखण्यासाठी सर्वांनी सतर्क राहावे - जिल्हाधिकारी डॉ.आशिया

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१७, अहिल्यानगर : :** अक्षयतृतीयेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात बालविवाह होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने विशेष सतर्कता बाळगण्यास सुरुवात केली असून, कुठेही बालविवाह होऊ नयेत यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी सतर्क राहून आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले. अक्षयतृतीया हा सण विवाहासाठी शुभ मानला जात असल्याने या दिवशी सामूहिक तसेच एकल विवाह सोहळ्यांचे मोठ्या प्रमाणावर आयोजन केले जाते. या पार्श्वभूमीवर बालविवाह होण्याची शक्यता लक्षात घेता प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्याचे निर्दे



श देण्यात आले आहेत.बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ नुसार मुलांचे किमान वय २१ वर्षे, तर मुलींचे किमान वय १८ वर्षे निश्चित करण्यात आले आहे. या वयोमर्यादेपेक्षा कमी वयात विवाह केल्यास तो बालविवाह ठरून बेकायदेशीर मानला जातो. अशा प्रकरणांमध्ये संबंधित पालक, नातेवाईक, आयोजक तसेच विवाह सोहळ्यात सहभागी असलेल्या सर्व संबंधितांवर गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. या गुन्ह्यासाठी दंड व कारावासाची तरतूद आहे.शासनाच्या अधिसूचनेनुसार ग्रामीण भागात ग्रामसेवकांची बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून अंगणवाडी सेविका सहाय्यक अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. शहरी भागात बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना प्रतिबंध अधिकारी, तर मुख्यसेविकांना सहाय्यक अधिकारी म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे. बालविवाह रोखण्यासाठी मंदिरे, मशिदी, चर्च, गुरुद्वारे, मंगल कार्यालये, बँडपथके, डीजे, केटरर्स, फोटोग्राफर तसेच विवाह विधी करणारे धर्मगुरूंनी बालविवाहास कोणत्याही प्रकारे सहकार्य करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. संबंधित यंत्रणांनी अशा ठिकाणी विशेष लक्ष ठेवून आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.अक्षय तृतीया तसेच वर्षभर कुठेही बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यास तात्काळ चाइल्ड हेल्पलाईन १०९८ किंवा पोलीस हेल्पलाईन ११२ या टोल-फ्री क्रमांकावर कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्हा बालविवाह मुक्त करण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहकार्य करावे, असेही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी नमूद केले.

### आश्रमशाळा अधीक्षकांकडून २४ तास ड्युटीचा आरोप; कामाचे तास निश्चित करण्याची मागणी



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१६, डहाणू (पालघर) :** महाराष्ट्र राज्यातील शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये कार्यरत अधीक्षक व अधीक्षिका यांच्याकडून २४ तास ड्युटी घेतली जात असून त्यांच्या कामाचे निश्चित तास ठरविण्यात यावेत, अशी मागणी शासकीय आदिवासी आश्रमशाळा अधीक्षक संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी केली आहे.

संघटनेच्या निवेदनानुसार, राज्यातील आश्रमशाळांमध्ये कार्यरत अधीक्षकांवर प्रचंड कामाचा ताण असून त्यांच्याकडून दिवसाचे २४ तास काम करून घेतले जाते. मात्र, या कामाचे कोणतेही निश्चित वेळापत्रक नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना मानसिक ताण, आरोग्याच्या समस्या (शुगर, ब्लड प्रेशर, हृदयविकार) यांसारख्या गंभीर अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

शासनाच्या इतर विभागांमध्ये कर्मचाऱ्यांसाठी निश्चित कामाचे तास आणि शिफ्ट पद्धती अस्तित्वात असताना, आदिवासी विकास विभागांतर्गत आश्रमशाळांमध्ये मात्र ही सुविधा उपलब्ध नसल्याचे संघटनेने नमूद केले आहे. अनेक ठिकाणी अधीक्षकांना १२ ते २४ तास काम करावे लागत असून साप्ताहिक सुट्टीही मिळत नाही, असेही या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

तसेच, ५०० ते ७०० विद्यार्थ्यांची जबाबदारी असतानाही सहाय्यक अधीक्षक व आवश्यक कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असल्यामुळे अधीक्षकांवर अतिरिक्त कामाचा भार पडत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या देखभालीसह प्रशासकीय कामे सांभाळताना मोठ्या अडचणी येत असल्याचे संघटनेने म्हटले आहे.

**संघटनेच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे :**

- अधीक्षकांच्या कामाचे तास निश्चित करण्यात यावेत
- 'अनावश्यक सेवा' बंद करण्यात यावी
- शिफ्ट पद्धती लागू करण्यात यावी
- साप्ताहिक व सार्वजनिक सुट्ट्या लागू कराव्यात
- आवश्यक कर्मचाऱ्यांची तातडीने भरती करावी
- शासन निर्णयांची कठोर अंमलबजावणी करण्यात यावी

संघटनेचे प्रकल्प अध्यक्ष हनुमान डाखोरे, मीडिया प्रसिद्धी प्रमुख योगेश चौधरी यांनी शासनाला आपल्या मागण्या निवेदन लक्ष देऊन सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा राज्यभर आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही दिला आहे.

# बल्लारपूर येथे पार पडली तालुकास्तरीय कार्यशाळा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, विसापूर (चंद्रपूर) :** आजघडीला आपली जीवनशैली बदलत आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे आपल्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. या मानसिकतेतून नागरिकांना बाहेर काढण्यासाठी माझं गाव, आरोग्य संपन्न गाव हे अभियान सुरु करण्यात आले आहे. बल्लारपूर पंचायत समिती यात अग्रेसर राहील. या अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणीसाठी गावकऱ्यांचा लोकसहभाग महत्वाचा असून अधिकारी व कर्मचाऱ्यांच्यासमन्वयक देखील महत्वाचा घटक आहे, असे प्रतिपादन बल्लारपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी धनंजय साळवे यांनी




बल्लारपूर येथे दि. १६ एप्रिल रोजी केले. चंद्रपूर जिल्हा परिषद अंतर्गत बल्लारपूर पंचायत समितीच्या वतीने गोंडराजे खांडक्या नाट्यगृह बल्लारपूर येथे माझं गाव, आरोग्य संपन्न गाव अभियान तालुकास्तरीय कार्यशाळा पार पडली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते.कार्यशाळेचे उदघाटन जिल्हा परिषद आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बल्लारपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी धनंजय साळवे होते. प्रमुख अतिथी म्हणून बल्लारपूर ग्रामीण रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. गजानन मेश्राम, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. आशा साळवे, वैद्यकीय अधिकारी डॉ. संदेश मामीडवार,डॉ. अश्विनी कांबळे, डॉ. रूबिना शेख, डॉ. डांगे, डॉ. वासनिक, गटशिक्षणाधिकारी सचिन मालवीय, पंचायत विस्तार अधिकारी दिलीप बैलनवार, आरोग्य विस्तार अधिकारी साहेबराव पवार यांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ. अशोक कटारे म्हणाले की, शासनाने आरोग्य संपन्न महाराष्ट्र करण्यासाठी कौतुकास्पद उपक्रम सुरु केला आहे. यासाठी विविध स्तरावर बक्षीस देण्याची योजना आहे. आरोग्य ही मूलभूत गरज आहे. यासाठी माझं गाव, आरोग्य संपन्न गाव, ही संकल्पना महत्वाचे आहे. आपण लोकसहभाग घेऊन सदर अभियान यशस्वी करा, असे मनोगत व्यक्त करताना डॉ. कटारे यांनी सांगितले. कार्यशाळेला बल्लारपूर तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आरोग्य कर्मचारी, आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी कार्यकर्त्या आदींची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

# 'फिकर नॉट' मोहिमेतून येरवडा नियंत्रणात, निरीक्षक कदम ठरले कर्दनकाळ !

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.१७, येरवडा (पुणे) :** सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी येरवडा परिसरातील लक्ष्मीनगर पोलिस ठाण्याला सदिच्छा भेट देत पोलिसांच्या धडाकेबाज आणि परिणामकारक कामगिरीचे कौतुक केले. या भेटीदरम्यान वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र कदम यांनी त्यांचे पुष्पगुच्छ व स्वतः काढलेल्या रेखाचित्राने आगळ्यावेगळ्या पद्धतीने स्वागत करत सन्मान केला. देसाई यांनीही स्मृतिचिन्ह देऊन कदम यांच्या कार्याला दाद दिली. नवीन लक्ष्मीनगर पोलीस ठाण्याच्या उद्घाटनानंतर कदम यांनी येरवडा परिसरासाठी एक सक्षम आणि कडक धोरण राबवत कायद्याचा दरारा निर्माण करण्याचा निर्धार केला आहे. फ्लेक्समुक्त येरवडा मोहिमेद्वारे अनधिकृत फ्लेक्स हटवण्यात आले, तर अवैध दारू अड्डे, गुंडगिरी आणि इतर बेकायदेशीर प्रकारांवर मोठ्या प्रमाणात बंदी घालण्यात आली. भाजी मंडईसह विविध संवेदनशील भागांत सातत्याने कारवाई करत गुन्हेगारीला आळा बसवण्यात आला आहे. अनेक कुख्यात गुंडांची जाहीर धिंड काढून पोलिसांनी स्पष्ट संदेश दिला गुन्हेगारांना येथे थारा नाही.

निरीक्षक कदम यांच्या नेतृत्वाखाली विशेष पेट्रोलिंग, रात्रंदिवस चक्कर आणि कोणालाही सूट नाही या कडक भूमिकेमुळे गुन्हेगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण




झाले आहे. फिकर नॉट या घोषणेने सामान्य नागरिकांमध्ये विश्वास आणि सुरक्षिततेची भावना बळकट केली आहे. आतापर्यंत अनेक गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले असून, अवैध दारू व्यवसाय व दहशत माजवणाऱ्या टोळ्यांवर प्रभावी कारवाई करण्यात आली आहे. भेटीदरम्यान देसाई यांनी भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावर भाष्य करत महिलांवरील अत्याचार आणि ब्लॅकमेलिंगच्या घटनांवर कठोर भूमिका मांडली. समाज आणि पोलीस यांच्यातील समन्वय वाढवण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

निरीक्षक कदम यांनी सामाजिक बांधिलकी जपत महिलांसाठी रोजगारनिर्मिती, युवकांना गुन्हेगारीपासून दूर ठेवण्यासाठी जनजागृती आणि पुनर्वसन उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या कडक पण संवेदनशील कामगिरीमुळे येरवडा परिसरात सकारात्मक आणि ठोस बदल जाणवत आहे.